# आंबेडकरवादी कवयित्री कुसुम अलाम यांच्या कवितेतील सामाजिक जाणीव

**डॉ. जगजीवन विश्वनाथ कोटांगले**
सहायक प्राध्यापक (मराठी विभाग)
कला, वाणिज्य महाविद्यालय,
पे.पंप, जवाहरनगर, भंडारा (महाराष्ट्र)
९९२३४८३७३८
jvkotangale@gmail.com

**प्रस्तावना :—**

कविता हा वाङ्मयप्रकार आंबेडकरवादी साहित्यातील फार महत्त्वाचा वाङ्मयप्रकार आहे. एवढेच नव्हे तर पहिला जोरकस वाङ्मयप्रकार आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक चळवळीने भारतातील वंचित बहुजन समाज जागृत झाला, त्यांचा आत्मभान जागृत झाला आणि या वंचित बहुजनांमध्ये दलित कष्टकरी, कामगार, आदिवासी, भटके विमुक्त असे सर्वच सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक विषमतेला बळी पडलेले समूहमन न्यायासाठी झूंज द्यायला लागले. यात पुरूषांबरोबर स्त्रियांचाही मोठा वाटा आहे. त्यात दलित स्त्रियांबरोबरच आदिवासी स्त्रियांचाही समावेश करता येईल. या पार्श्वभूमीवर विचार करता उषाकिरण आत्राम या कवयित्रीच्या नंतर कुसुम अलाम या कवयित्रीचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो.

कुसुम अलाम या आंबेडकरवादी कवयित्रींचे 'रानआसवांचे तळे' (१९९८) व 'रान पाखरांची माय' (२०००) असे दोन लक्षणीय काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. आंबेडकरवादी साहित्य चळवळीने साहित्यातून अंगार फुलवला व सामाजिक न्यायासाठी वाङ्मयाच्या माध्यमातून युद्ध पुकारले तसे आपणही त्यांच्या चळवळीचे पाईक होऊन आपल्या आदिवासी बांधवाच्या वेदनेचे त्यांच्यावर होत असलेल्या अन्याय, अत्याचारांचे दु:ख जगापुढे मांडावे व न्यायासाठी सर्वशक्तीनिशी संविधानिक मार्गाने लढा द्यावा असे कुसुम अलाम यांना वाटते. आपण विद्रोही कवयित्री आहोत याचा त्यांना गर्व आहे आणि जोवर विषमता आहे तोवर हा विद्रोह विश्रांत होणार नाही अशी त्यांची ठाम भूमिका आहे. आदिवासींचे जीवन बदलले पाहिजे असे त्यांचे कविता निर्मितीमागील प्रयोजन आहे. तसा त्यांचा आशावाद आहे.

कुसुम अलाम यांचा 'रान आसवांचे तळे' हा पहिला काव्यसंग्रह सामाजिक बांधिलकीचे जबरदस्त भान घेऊन हा काव्यसंग्रह मराठी काव्यक्षेत्रात आला व याने कुसुम अलाम यांना नवकाव्यप्रवाहात विशेष स्थान मिळाले. त्यांचा हा काव्यसंग्रह आदिवासी कविता व आंबेडकरवादी कविता या दोन्ही काव्यप्रवाहाशी समन्वय साधणारा ठरला आहे. त्यांच्या कविता मुख्यत्वे आदिवासी जीवन जाणिवेच्या मातृकोषातून जन्मास आला असला तरी त्याचे पुरोगामी विचार प्रणालीस; फुले—आंबेडकर तत्त्वप्रणालीस थेट नाते सांगणारा आहे. त्यांच्या कवितेतून उद्धृत झालेली आशय जाणीव स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायाचा पाठपुरावा करणारी आहे. येवढेच नव्हे तर परिवर्तनाची प्रकाशवाट उलगडणारी आहे. स्वराज्यातही आदिवासी समाज आर्थिक व सांस्कृतिक दृष्टीने नागविला गेला. संस्कृती व भाषेच्या भिन्नतेमुळे समाजाच्या मुख्य प्रवाहापासून समाज दूर राहिला. स्वातंत्र्यानंतरही आदिवासी समाज नागडाच राहिला याचे दु:ख कवयित्रीला असहाय्य होते. तेव्हा कवयित्रीच्या कवितेत याचे पडसाद उमटतात, ''म्हणूनच माझ्या मुखावाटे लाव्हा बाहेर पडतो.'' हा लाव्हाच

त्यांच्या कवितेतून पानोपानी आविष्कृत झालेला आहे. मुख्य प्रवाहातल्या धनदांडग्यांनी त्यांच्या जमीनी गडप केल्या. वन खात्याने त्यांच्याच वनांत प्रवेश नाकारला त्यांच्या अज्ञानाचा गरीबीचा प्रस्थापितांनी फायदा घेवून त्यांच्या प्रकाशवाटाच खुंटित केल्या, याचा राग त्यांची कविता अनेक ठिकाणी व्यक्त करते.

''अस्मितेच्या रक्षणासाठी
मनुवाद्यांना प्रखर विरोध करावा''

असा खडा सवाल ती करते. आदिवासींचे हे नाडलेपण बदलवायचे असेल तर मनुवाद्यांचा पाखंड समजून घेतला पाहिजे व प्रकाशवाटेची कास धरावी लागते. 'आयु य वेचतांना' या कवितेत त्यांची स्वत्वभानाची व स्वयंप्रकाशीत होण्याची तीव्र इच्छा व्यक्त होताना दिसते.

''अंधार वाटेने जाताना
व्हावे लागते स्वत:च दीप...''

धर्माच्या, संस्कृतीच्या नावावर शतकानुशतके त्यांची क्रूर थट्टा केली त्यांची मूळ आदीम धर्म व संस्कृती उद्ध्वस्त करून त्यांना आणखीनच वंचित केले म्हणून त्या आपल्या भावना व्यक्त करतात, ''इथल्या कपटी मनुसंस्कृतीचे जोखड झुगारून, आमच्यावर लगाम धरलेले त्यांचे मनगट तोडून टाकायचे आहे'' असा विद्रोह त्यांची कविता करताना दिसते. हा त्यांचा विद्रोह न्यायासाठी नवनिर्माण समाजासाठी आहे. सारे जग झपाटल्यासारखे बदलत असताना आमचा आदिवासी समाज तसाच मंद व स्थिर आहे. म्हणून कवयित्री म्हणतात,

''घे शपथ या विशाल गगनाची
हे जग मी सुंदर करून जाणार आहे.''

अशाप्रकारे आशावाद व्यक्त करत त्यांची 'रानआसवांची' कैफियत त्यांच्या कवितांतून व्यक्त होते. शेवटी सकारात्मक बदल हवे असेल तर पेटून उठल्याशिवाय क्रांती असंभव असल्याची जाणीव त्यांच्या 'आसवांचे तळे' मधून मोठया पोटतिडखीने व्यक्त झाली आहे.

'रान पाखरांची माय' या त्यांच्या दुसऱ्या काव्यसंग्रहात पहिल्या काव्यसंग्रहाचे उज्ज्वल विकसन झाले दिसते. त्यांची सामाजिक बांधिलकी अधिक सक्षम होत जाते; समाजसन्मूख जीवन–जाणीव आणखी परिपृष्ठ होत जाताना दिसते. कवयित्रीने 'रानआसवांचे तळे' व 'रान पाखरांची माय' या दोन काव्यसंग्रहाचा संबंध स्पष्ट केला आहे. ''अस्मितेची जाण यावी संघर्षाचे नवे तराने नव्या पिढीने गावे. नवा आशावाद आदर्शवाद जुण्या पिढीला दाखवून त्यांचेकडून गौरवान्वित व्हावे हयाच हेतूने हे लिहीने... 'रान आसवांचे तळे' काठोकाठ भरले आहे. वेदनेचा महापूर आला वेदना प्रवाहीत झाली आता 'रानपाखरांची' भेजारलेली माय आपल्या कुपोषित पिलांसाठी सुरक्षा शोधत आहे. तिच्या घरटयात अशांतता निर्माण झाली आहे. काळोख भरल्या डोळयांना कोणत्याही दिशेचा थांग नाही म्हणून रानभर भिरभिरणारे रानपाखरे या क्रूर कोलाहलात जिवाचा आकांत करीत रानाच्या पिंजऱ्यात अडकून पडले आहेत. तरीही तुला जगावेच लागेल आणि तेही सन्मानाने. ही जिद्द तिच्या उरात आहेच'.

भविष्यासाठी धडपडणारा आदिवासी समाज स्वातंत्र्यातही नक्षलवादी व पोलीस संघर्षास भयभीत होत आहे. डोंगर दऱ्यात दडून असलेला हा आदिवासी गोंडवणातला पाखरू उज्ज्वल संस्कृती लाभलेला हा जंगलातील माणूस भारतीय स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षानंतरही इतका मागे का?

''स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षात
व्यथा माझी अशी आहे
छातीवरती बंदू आणि
पाठीमागे दंडुक आहे.''

पोलीस आणि नक्षलवादी यांच्या दहशतीमुळे आदिवासी माता भगिनी व तरूणांची सुकुमार स्वप्ने जळून खाक होत आहेत ही साधारणपणे सर्व कवितांची पार्श्वभूमी आहे. परंतु कवयित्री निराश न होता परिस्थितीचा सामना करण्यास सिद्ध होते. तरूणांना उद्देशून 'गोंडवन माझे' या कवितेत लिहितात.

''अगा गोंडाच्या गा राजा, तुले इचारू का एक !
आहे भयभीत कसा, आज जंगलचा लेक ! ...
झाले सोसून सोसून उठ वेगी वेगीं जावू !
तीरकमठयाची धार आता लेखनीले लावू !''

'तीरकमठा' या प्रतिमातून गोंड संस्कृतीचा इतिहास व्यक्त होतो. 'तीरकमठा' हा गोंडाचा मुख्य शस्त्र एवढेच नव्हे तर तो क्षत्रीय असल्याचा ऐतिहासिक पुरावा सुद्धा आहे. या तीरकमठयानेच त्यानी अनेक युद्ध जिंकली व उदरनिर्वाहासाठी शिकारीचे मुख्य हत्यार म्हणून वापर केला. हा तीरकमठा आता शिक्षणरूपी ज्ञानाने प्रकाशमान करू. सारा गोंडवन सुशिक्षित करू हा सुंदर संदेश देत ही कविता 'शिका—संघटित व्हा व संघर्ष करा' असा फुले—आंबेडकरी चळवळीचा वारसा सांगत आहे.

''शस्त्र बाळगणं आम्हास काय नवीन?
पण आता....?
लोकशाहीला परवडणारीच
सारी शस्त्रे परजली पाहिजेत.
गोंड, माडीया, परधान, थोटी
उतरंड मोडल्या शिवाय कसं चालेल''

आपणच आपल्यात भेदाभेद केलो तर चालणार नाही, आधी आम्ही पोटजाती विसरून संघटीत होवू व आपल्यावर होत असलेल्या अन्यायी प्रहाराला चोक उत्तर देवू.

''आपल्या मर्दानी छातीवर होणारे प्रहार
आता थांबवलेच पाहिजेत...
एका सुंदर युगासाठी.... !

असे 'एक सुंदर युगासाठी...!'' या कवितेत कवयित्रीने आपली भूमिका स्पष्ट केली दिसते.

त्यांची कविता आदिवासी तरूणांना जशी आत्मजागृतीचा संदेश देते, तशी आदिवासी भगिनीलाही सजग व जागृत करते. 'बेडीबंद' या कवितेत आदिवासी तरूणींना त्यांच्या दु:खाला, शोषणाला कारण असणाऱ्या सर्व अमंगल गोष्टींना नकार देण्याचे आवाहन करते. आदिवासी स्त्रियांच्या गरीबीमुळे छातीवर नसलेला पदर आणि दारिद्रयापोटी उघडया ठेवाव्या लागणाऱ्या मांडया—पोटऱ्या' पाहून कवयित्री अस्वस्थ होते आणि हे बदलले पाहिजे म्हणून हळूच आदिवासी स्त्रीला कानमंत्र देते,

''अजून कशी अंधारातच गे तू...?
दारिद्रय आणि अज्ञानामुळे लादल्या गेलेल्या

काही प्रथा परंपरांना का नाकारत नाहीत...!''

'होराभूषण' कवितेत ज्योतिषी व मांत्रिक शक्तींना स्पष्ट नकार देताना दिसते. आमचे भविष्य ज्योतिषी किंवा मांत्रिक घडवू शकतच नाहीत. आमचा आदिवासी या अनिष्ट अंधश्रद्धेला बळी पडला म्हणूच आमचे भविष्य अंधार आहे ही सत्यता त्यांनी व्यक्त केली.

''हस्तरेषा पंचाग अन कुंडली
सारी पोटभरू साधने

असे ! आता आपणच आपलं भविष्य घडवू ! 'निर्णायक युद्ध' या कवितेत म्हणूनच त्यांचे शब्द युद्धाची भाषा बोलतात.

''आमच्या आसपासचे हे संकट कोणी आणले इथे?
कुणी पेरले भय या भूमीत ....?
आम्ही कुणाचे काय घोडे मारले...?
आमचा छळ करणाऱ्याशी
निर्णाय युद्ध व्हायलाच पाहिजे...!''

आदिवासी समाजाचे समूह दु:ख कवयित्रीने पानोपानी मांडले आहे. या गोंडवनाला साफल्याने शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न त्यांची कविता वास्तविकतेच्या अंगाने व्यक्त होते. तशी ती जिवंत वाटत जाते व त्यांच्या आयुष्य ज्या कारणाने अनेक प्रश्न निर्माण केले त्याचा शोध घेवून त्यांचे कारस्थान उघडे पाडते. 'कारस्थान' या कवितेत ते लिहितात.

''त्यांनी माझे दारिद्रयाचे नाते
संस्कृतीशी जोडून
म्युझियममध्ये आणून बसविले
... आता वेदनांचे वादळ घेऊन
अस्तित्त्व शोधतोय मी...
मला नामशेष करण्याचे
वर्णवाद्यांचे कपटी कारस्थान
मी ओळखले आहे...!
सावध रहा ऽऽ ! सावध रहा ऽऽऽ !
झंझावात येत आहे... !

आदिवासींचा खोटा इतिहास रचून त्यांच्या दारिद्रयाचे मूळच चुकीचे सांगितल्या गेले. खरें तर त्यांच्या दारिद्र्याचे, गरिबीचे मूळ वर्णवादी विचारप्रणाली आहे. वर्णवादयाच्या कपटी कारस्थानाने हा जंगलचा राजा दरिद्री झाला याचे वास्तविक भान कवयित्रीला होते आणि म्हणून ती कपटी कारस्थानावर शस्त्र उगारत झंझावात होवून सर्वत्र रान पेटवते. हा झंझावात अनेक कवितेचा स्थायीभान आहे म्हणूनच यांच्या कवितांविषयी आंबेडकरवादी जेष्ठ समीक्षक विचारवंत डॉ. यशवंत मनोहर म्हणतात, ''आंबेडकरवादी साहित्य चळवळीने साहित्यातून अंगार फुलवला तसा आपणही फुलविला पाहिजे असे कुसुम अलाम यांना वाटले आहे... जोवर विषमता आहे तोवर हा विद्रोह विश्रांती घेणार नाही ही त्यांची भूमिका आहे. पण हा

विद्रोह लोकशाहीच्या मार्गाने करायचा आहे. संविधानिक मार्गच योग्य आहे. न्याय तर मागायचा आहे. संघर्ष अटळ आहे. न्यायासाठी हे कारण भाग आहे. 'न्यायासाठी' या कवितेत कवयित्रीने हे स्पष्टच केले आहे.

''तसं तर तीरकमठाच उधळू शकतो काणतीही वाट
पण नांदल्या लोकशाहीची इज्जत करणे माझा धर्म आहे
न्यायव्यवस्था लोकशाहीचा मीच आधार आहे
सत्य आणि अहिंसा यावर काय बोलू...?
मी तडफडतोय न्यायासाठी...!
कायदा सुव्यवस्था मलाच सांभाळायची आहे.!''

अशाप्रकारे कवयित्रीचे मन आदिवासींच्या न्यायासाठी काव्यसंग्रहाभर तडफडत आहे. 'शिका संघटित व्हा' पासून सुरू झालेला त्यांचा 'काव्यप्रवास न्यायासाठी संघर्ष करा' पर्यंत येवून ठेवला आहे. कुसुम अलाम यांची कविता असा विकसंशिल प्रवास करीत आदिवासी समूहालाच एका आदर्श वाटेने नेत असल्याचे वाटते. त्यांचा हा वाङ्मय व आदिवासी समाज—चळवळीचा प्रवास उत्तरोत्तर नवसमाज निर्मितीची आशा पल्लवीत करणारा आहे.

कुसुम अलाम यांच्या कवितेने अशाप्रकारे आदिवासी समाजमनाचा वेध घेतलेला आहे. त्यांची कविता समूहजाणिवेशिवाय काहीही बोलत नाही. आदिवासी बांधवांचे दु:ख, वेदना, दारिद्रय, अज्ञान, अंधश्रद्धा, अन्याय, विषमता व मागासलेपण साकल्याने आपल्या कवितेत मांडते व या सर्वच अमंगल गोष्टीला कारणीभूत ठरणाऱ्या व्यवस्थेविरूद्ध युद्ध पुकारताना दिसते. आदिवासी समाजाच्या परिवर्तनासाठी पूर्ण जबाबदारी स्वत:वर ही कविता घेताना दिसत आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून सामाजिक कार्य कुसुम अलाम यांनी स्वीकारले आहे. त्यांच्या कविता सामाजिक चळवळ व साहित्य चळवळ या दोन्ही बाजू समर्थपणे सांभाळत आहेत असे लक्षात येते.

**निष्कर्ष :—**

१. कुसुम अलाम यांच्या कवितेने आदिवासी समाजाच्या समूहमनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.
२. सामाजिक बांधिलकी हा त्यांच्या कवितेचा स्थायीभाव असून समताधिष्ठित समाजनिर्मिती व्हावी हे त्यांच्या काव्याचे प्रयोजन दिसते.
३. त्यांच्या कवितेत आदिवासी जीवन संस्कृती व त्यांचे मागासलेपण त्याचा एका अर्थाने शोध घेण्याचा प्रयत्न केला असून साकल्याने त्याला काव्यात उजागर करण्याचा ध्यास कवितेत घेतला आहे.
४. वेदना, विद्रोह व नकार हा आंबेडकरवादी साहित्य विशेष त्याच्या कवितेचा मूळ गाभा आहे.
५. त्यांची कविता आदिवासी शोषितांचे प्रतिनिधित्व करते. व्यक्तिकडून समिष्टीकडे चाललेला तिचा प्रवास खऱ्या अर्थाने परिवर्तनवादी आहे.
६. साधेपणा व झटितीप्रत्यय हे त्यांच्या काव्याचे लक्षणीय वैशिष्टय त्यांच्या प्रत्यक्ष आदिवासी जीवन जाणीवेच्या वास्तविक अनुभवासारखे असून आशय आणि अभिक्तेचे साधेपण हे एकजीव रसायन बनून ओसंडून वाहत आहे.
७. कुसुम अलामची कविता आंबेडकरवादी कवितेची वैशिष्टये आत्मसात करीत असली तरी आदिवासी जीवनानुभवाची बांधीलकी सतत जोपासत असल्यामुळे तिने आपले वेगळेपण टिकवून ठेवले आहे.

**समारोप :–**

कुसुम अलामची कविता रचनेच्या तंत्रयुक्ता वापरण्याच्या भानगडीत पडत नाही. प्रतिमा, प्रयोगशीलताच्या बेगडीपणात ती अडखत नाही. प्रवाही, गतिमान, मुक्तच्छंदाचा वापर करून क्रांतीकारी जीवनाशय मांडला त्यामुळे त्यांची कविता कोणत्या जातीशी वा प्रदेशाशी अशी मर्यादित न राहता सर्वंकष शोषणाचे निर्मूलन करण्यास तयार झालेली आहे. म्हणून ती मनुष्यवादी आहे. कवयित्रीने शोषणातून मुक्ती असा मानवधर्म कवितेतून मांडला आहे. आपण सामाजिक–आर्थिक शोषणाच्या मुक्तीचा स्वर आहोत असी त्यांची कविता मानते म्हणून तिचे भविष्य मोठे आहे. त्यामुळेच मराठी कवितेत तिने आपले अस्तित्त्व निर्माण केले आहे.

**संदर्भग्रंथ :–**

१. अलाम कुसुम, रान पाखरांची माय, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, २०००.
२. कवठेकर बाळकृष्ण, दलित साहित्य : एक आकलन, मेहता, पुणे, १९९१.
३. मनोहर यशवंत, आंबेडकरवादी मराठी साहित्य, भीमरत्न, नागपूर, १९९९.